MHAU060006602022

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०२२ मधील नि.क्र.३३ खालील आदेश</u>

**( छायाबाई धोतरे व इतर वि. साहेबराव दापके )**

१. दोन्ही पक्षाचे युक्तीवाद ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा अर्ज नि.दि.दा.क्र.१११/२०१८ असा दाखल केलेला आहे. सदरचा दावा क्रमांक नि.दि.दा.क्र.१११/२०१८ हा वादी यांनी कथन केलेल्या पक्षकारांच्या नावे अस्तित्वात नाही. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या अर्जावरील पक्षकारांच्या नावाचे अवलोकन करता सदरचा अर्ज हा मुळ दाव्यात दाखल करण्यात आलेला आहे किंवा प्रतिदाव्यात दाखल करण्यात आलेला आहे यामध्ये प्रथमदर्शनी साशंकता निर्माण होते. वादी यांनी दाखल केलेला अर्ज क्रमांक व नमुद केलेले पक्षकार हे चुकीचे नमुद असल्याने प्रथमदर्शनी सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. परंतु नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन सदरचा अर्ज न्यायाच्या हेतुत्सव गुणदोषावर निकाली काढण्यात येत आहे.

२. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी यांच्याविरुध्द त्यांनी मुळ खरेदीखत क्र. २४५३/२००३, ८०६/२००४, ३४७३/२००६, ७/२००९ या खरेदीखताच्या प्रती दाखल करण्यास आदेशीत करण्याकरीता दाखल केलेला आहे.

३. वादी यांनी असे कथन केले आहे की, सदरचे प्रकरण हे तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या युक्तीवादासाठी तसेच कोर्ट कमिशनरच्या अर्जावर मुळ प्रतिवादीचे म्हणणे येणेवर प्रलंबित आहे. मुळ प्रतिवादी यांनी दाव्यात त्यांचा खरेदीखत क्र. २४५३/२००३,

८०६/२००४, ३४७३/२००६, ७/२००९ चा उल्लेख केलेला आहे. सबब, सदरचे खरेदीखत मुळ प्रतिवादी यांनी दाव्यात दाखल करावे असे आदेश पारित करण्याची विनंती केलेली आहे.

४. सदर अर्जात प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी यांनी प्रति दावा दाखल केलेला आहे व तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर वादी यांचा युक्तीवाद पुर्ण झालेला आहे व प्रतिवादी यांच्या युक्तीवादावर सदरचा प्रतिदावा प्रलंबित असताना सदर दाव्यातील मुळ वादी हे हेतुपूरस्सरपणे युक्तीवाद करण्यास टाळाटाळ करत आहे. तसेच सदर दाव्यात खरेदीखत क्र. ३४७३/२००६ व ७/२००९ चे खरेदीखताचे प्रत दाखल केलेली आहे. सबब, प्रतिदाव्यातील तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जावर आदेश होणे आवश्यक असून सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा अतिक्रमण काढुन ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदर दाव्यात प्रति दावा दाखल करुन वादी यांच्याविरुध्द तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांच्या ताब्यातील खरेदीखत क्र. २४५३/२००३, ८०६/२००४, ३४७३/२००६, ७/२००९ च्या प्रति सदर दाव्यात दाखल करण्याकरीता आदेश पारित करण्यात यावेत. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सदर प्रति दाव्यासोबत प्रतिवादी यांनी निशाणी ३२ कडे खरेदीखत क्र. ३४७३/२००६ व ७/२००९ च्या प्रति दाखल केलेल्या आहेत. प्रतिवादी यांनी त्यांच्या प्रतिदाव्यात असे कथन केले आहे की, संतोष ठमाजी याने गट नं. ६९३ मध्ये ४० आर क्षेत्र रजिस्टर

खरेदीखत क्र. २४५३/२००३ आधारे काऊंटर क्लेमंट यांना रक्कम रुपये ५१,०००/– मध्ये विक्री केली. सदरील खरेदीखता आधारे काऊंटर क्लेमंट हा ४० आर क्षेत्राचा मालक व कब्जेदार झाला. त्यानंतर काऊंटर क्लेमंट याने सदरील ४० आर क्षेत्र हे काऊंटर क्लेमंट याने संतोष ठमाजी धोतरे यांना दिनांक १०.०२.२००४ रोजी रजिस्टर खरेदीखत क्र. ८०६/२००४ आधारे विक्री केली. यावरुन असे दिसून येते की, काऊंटर क्लेमंट याने ४० आर क्षेत्र हे संतोष ठमाजी धोतरे यांना विक्री केलेली आहे. त्यामुळे खरेदीखत क्र. ८०६/२००४ चा दस्त खरेदी घेणार संतोष ठमाजी धोतरे यांच्या ताब्यात असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच काऊंटर क्लेमंट यांनी संतोष ठमाजी धोतरे यांच्याकडुन खरेदीखत क्र. २४५३/२००३ ने ४० आर क्षेत्र खरेदी केलेले दिसून येते. सदरचा प्रतिदावा हा तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जावर युक्तीवादाकरीता प्रलंबित आहेत. सदरचा तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज न्यायनिर्णयीत करीत असताना काऊंटर क्लेमंट याने वाद मिळकतीतील ताबा व त्यास होणारा हरकत अडथळा तसेच काऊंटर क्लेमंट यास प्रथमदर्शनी केस असल्याचे, न्यायाचा समतोल काऊंटर क्लेमंटच्या हक्कात असल्याचे तसेच तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास काऊंटर क्लेमंटचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे या बाबी तसेच प्रतिदावा सिद्ध करण्याची जबाबदारी प्रतिवादी याची आहे. वादी यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, वादी हे हेतुपूरस्सरपणे प्रतिवादी यांच्या प्रतिदाव्यातील तात्पुरता मनाई हुकूमाच्या अर्जावर युक्तीवाद करण्यास टाळाटाळ करत आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज निशाणी ३३ रक्कम रुपये ५००/– (पाचशे रुपये फक्त) च्या खर्चासह नामंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी सदर अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५००/– प्रतिवादी यांना द्यावे.

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2023.05.19 16:38:06 +0530

**( श्रीमती अ. ई. आवटी )**

ठिकाण : कन्नड.
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर

दिनांक : १७.०५.२०२३
(कोर्ट न.२) कन्नड.

# <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. आदेश या मधील सर्व मजकुर मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | **श्रीमती अ. ई. आवटी,**<br>सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| लघुलेखकाचे नांव | :- | -- |
| टंकलेखकाचे नांव | :- | एल.बी.आडे (कनिष्ठ लिपीक) |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | १७.०५.२०२३ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | १७.०५.२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | १९.०५.२०२३ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | १९.०५.२०२३ |

----------------------------